स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील मानव्य विद्याशाखेअंतर्गत 'राज्यशास्त्र' विषयातील पीएच्.डी.पदवीकरिता सादर करावयाचा शोधप्रबंधाचा प्राथमिक आराखडा

"माहितीचा अधिकार कायदा २००५ : विशेष संदर्भ लातूर आणि नांदेड जिल्हा परिषदेतील अंमलबजावणीचा तूलनात्मक अभ्यास-इ.स.२०१५ ते इ.स.२०२०"

संशोधक

वाघमारे हिरामन लिंबराज

एम.ए. (राज्यशास्त्र), सेट, नांदेड

मार्गदर्शक

प्रा.डॉ.आर.डी.शिंदे

राज्यशास्त्र विभाग प्रमुख तथा संशोधक मार्गदर्शक,
लोकमान्य महाविद्यालय, सोनखेड, ता.लोहा, जि.नांदेड

संशोधन केंद्र

पीपल्स महाविद्यालय, नांदेड

मार्च २०२२

"माहितीचा अधिकार कायदा २००५ : विशेष संदर्भ लातूर आणि नांदेड जिल्हा परिषदेतील अंमलबजावणीचा तूलनात्मक अभ्यास - इ.स.२०१५ ते इ.स.२०२०"

प्रस्तावना :-

माहिती अधिकार म्हणजे शासकीय यंत्रणेकडून माहिती मागण्याचे लोकांना मिळालेले स्वातंत्र्य होय. भारतात माहिती अधिकार कायदा ११ मे २००५मध्ये केंद्र सरकारने मंजूर केला. तर १२ ऑक्टोबर २००५ पासून हा कायदा अंमलात आला. भारतीय राज्य घटनेतील अनुच्छेद १९ प्रमाणे प्रत्येक व्यक्तीला भाषण आणि विचार स्वातंत्र्यचा हक्क आहे. या हक्काचाच एक भाग म्हणून आपण माहिती अधिकाराकडे पाहतो. माहिती अधिकार हा व्यक्तीचा नैसर्गिक, मानवी आणि मूलभूत अधिकार आहे. या अधिकाराला मूलभूत अधिकाराचा दर्जा असल्यामुळे त्यात साध्या कायद्याप्रमाणे बदल किंवा सुधारणा सरकारला करता येत नाही. तसेच मूलभूत अधिकारांचा दर्जा या अधिकाराला असल्यामुळे हा अधिकार साध्या कायद्याप्रमाणे काढून घेतला जाऊ शकत नाही.

लोकशाही शासन व्यवस्थेत माहिती अधिकाराच्या कायद्याला महत्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. ब्रिटिश शासन व्यवस्थेपासून, प्रशासनात कार्यालयीन गुप्ततेचा कायदा अस्तित्त्वात होता. त्यामुळे सर्व प्रशासकीय व्यवहारांना संरक्षण मिळत असे. मात्र आता अंमलात असलेल्या माहितीच्या अधिकारामुळे नागरिकांकडून मागणी केलेली माहिती द्यावीच लागणार आहे. त्यामुळेच प्रशासनात खूलेपणा किंवा पारदर्शकपणा येऊ शकेल. शासन व प्रशासनाचे कार्य, त्यांची धोरणे व योजना इत्यादींची माहिती लोकांना या अधिकारामुळे मिळू शकते. त्यामुळे प्रशासकीय कामकाजाबाबत लोकांमध्ये जागरूकता निर्माण होऊन प्रशासन आणि जनता यांच्यातील दरी कमी होण्यास मदत होईल. भ्रष्टाचारास प्रतिबंध करण्यासाठी माहितीचा अधिकार हे प्रभावी अस्त्र आहे. सनदी नोकरांना आपली कृती, कार्ये केव्हाही

सार्वजनिक होऊ शकेल आणि जनतेला आपल्याला जाब द्यावा लागेल याचे भान ठेवावे लागेल.

देशात माहिती अधिकार कायद्यानुसार 'केंद्रिय माहिती आयोग' स्थापन केला आहे. केंद्रिय मुख्य अधिकारी या आयोगाचे प्रमुख असतात. त्यांच्याबरोबर आयोगात इतर दहा माहिती आयुक्त असतात. त्यांची नेमणूक पंतप्रधान, विरोधी पक्षनेता आणि केंद्रीय मंत्री अशा त्रिस्तरीय समितीकडून करण्यात येते. हे पद निवडणूक आयुक्तांसारखे स्वायत्त आहे. केंद्र व राज्य सरकारचा त्यांच्यावर अंकुश नाही.

माहितीचा अधिकार हा केंद्र, राज्य सरकार तसेच स्थानिक स्वराज्य संस्था या सर्वांना लागू आहे. सरकारचे सर्व विभाग, महामंडळे, ग्रामपंचायत, महापालिका, जिल्हा परिषद, सहकारी संस्था, रेल्वे, शिक्षण संस्था, जिथे सरकारचा संबंध आहे, अशा सर्व यंत्रणांवर हा कायदा बंधनकारक आहे. प्रत्येक कार्यालयात माहिती अधिकाऱ्याची आणि अपिलीय अधिकाऱ्याची नेमणूक केलेली असते. हे अधिकारी कोण आहेत? हे लोकांना समजावे म्हणून कार्यालयाबाहेर त्यांचे नाव लावण्यात येते. छोट्या मोठ्या माहितीसाठी पूर्वी लोकांना मंत्रालयाचे खेटे मारावे लागत असत. परंतु आता या कायद्यामुळे लोकांना त्या त्या स्तरावर संपूर्ण माहिती मिळू शकते.

अर्जदाराला माहितीच्या बाबतीत अर्ज भरताना माहिती मागवण्याचा उद्देश नमूद करण्याची आवश्यकता नसते. माहिती व्यक्तीच्या जीविताशी आणि स्वातंत्र्याशी निगडीत असेल तर अशी माहिती ४८ तासात मिळू शकते.

अपवाद राष्ट्राची सुरक्षा, एकात्मता, सार्वभौमत्त्व, परराष्ट्र संबंध, न्यायालये, संसद, विधानसभा सदस्यांचे विशेषाधिकार, एखाद्याच्या जीविताला धोका निर्माण होईल अशा स्वरूपाची माहिती सोडून इतर सर्व प्रकारची माहिती या अधिकाराद्वारे माहितीचा अधिकारही अमर्यादित नाही. गेले दशकभर माहितीचा कायदा अस्तित्त्वात असूनही त्याचा परिणामकारक

वापर होताना दिसून येत नाही. यासाठी हा अधिकार कसा वापरावा यासाठी नागरिकांना मोठ्या प्रमाणावर मार्गदर्शन करण्यात यावे. तसेच या अधिकारांची परिणामकारक अंमलबजावणी होण्यासाठी सरकारी यंत्रणेत काम करण्याऱ्यांनाही प्रशिक्षण देण्यात यावे.

समाजातील सर्व स्तरांमध्ये या अधिकारांचा परिणामकारक वापर झाल्यास सुदृढ आणि सशक्त लोकशाही अस्तित्त्वात येण्यासाठी मदत होईल.

संशोधन विषयाचे महत्त्व :-

भारतात माहिती अधिकारांची चळवळ सध्या वेगाने पसरत आहे. जनतेला मिळालेले हे शस्त्र आज इतके प्रभावी ठरतेय की, सरकारी यंत्रणेतील भ्रष्ट घटक यामुळे अस्वस्थ होणे अपरिहार्य होते. गेल्या काही वर्षात माहिती अधिकारांसाठी लढणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांची हत्या झाली. यातून भ्रष्टाचाऱ्यांतील अस्वस्थता दिसून येते. आपल्या देशात सरकार आणि जनता यांच्यातील संवाद कमी होतो. "सिक्रसी" चे कारण देत ही दरी अधिक रुंदवण्याचा शासनयंत्रणा प्रयत्न करते.

माहिती अधिकार अधिनियमाचे दुहेरी फायदे आहेत. वैयक्तिक पातळीवर प्रत्येक व्यक्तींना त्याच्या आवश्यकतेनुसार हवी ती माहिती त्वरीत प्राप्त होते. तसेच आवश्यक ती प्रमाणपत्रे, दस्तऐवज, विविध कार्यालयातील प्रलंबित असलेल्या विविध प्रकरणांची सद्य:स्थिती पर्यंतच्या अनेक बाबींची माहिती प्रत्येकास मिळते. शासकीय विभाग कशी कामे करतात, कोणत्या कार्यपद्धती अवलंबितात, जनतेला कशा प्रकारची सेवा देतात हे जाणून घेण्याचा अधिकार प्रत्येकाला प्राप्त झाला आहे. विविध खात्यातील न्यायालयीन, प्रशासकीय नस्ती (फाईल) पाहणे, एखाद्या प्रकरणांची सद्य:स्थिती आणि कार्यवाही यांची पाहणी, विभाग कामाबाबतची पाहणी, निविदा इत्यादी बाबींची माहिती प्रत्येकास प्राप्त करून घेता येईल. प्रशासकीय कार्यक्षमता, भ्रष्टाचाराला विरोध, सर्वसामान्यांचे सबलीकरण, प्रसारमाध्यमांचे

सक्षमीकरण आणि नागरीकांचा प्रशासनातील सहभाग या सर्वच प्रश्नांचा शोध घेण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन कार्य महत्त्वाचे आहे.

केंद्र सरकारने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंमलात आणला आणि सर्व नागरिकांना संसदेच्या आणि राज्य विधानमंडळाच्या सदस्या इतके अधिकार प्राप्त झाले असून या अधिनियमामुळे शासकीय कार्यात पारदर्शकता निर्माण झाली काय? त्याचबरोबर प्रशासनात जबाबदारीची जाणीव आणि नागरिकांप्रती उत्तरदायित्त्वाची भावना निर्माण झाली काय? माहिती मागणे हा नागरिकांचा घटनात्मक अधिकार बनला असून माहिती देणे हे घटनात्मक जबाबदारी किंवा कर्तव्य बनले आहे काय? या अधिकारामुळे नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे रक्षण होत आहे काय? नेमकी कोणती माहिती मिळवावी, कशी मिळवावी, किती मुदतीत मिळवावी या विषयीच्या व्यवहार्य शासकीय पद्धतीची आखणी या कायद्याने करून दिली आहे हा कायदा प्रशासनावर अंकुश ठेवून कल्याणकारी राज्याच्या निर्मितीला चालना देणारा असल्याने याबाबत वस्तुस्थिती काय आहे? हे अभ्यासपूर्वक मांडण्यासाठी प्रस्तुत अभ्यास विषय महत्त्वाचा आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

"माहितीचा अधिकार कायदा २००५ : विशेष संदर्भ लातूर आणि नांदेड जिल्हा परिषदेतील अंमलबजावणीचा तूलनात्मक अभ्यास - इ.स.२०१५ ते इ.स.२०२०" हा संशोधनाचा मुख्य हेतू आहे. या मुख्य हेतूच्या अनुषंगाने खालील उद्दीष्ट्ये ठरविण्यात आलेली आहेत.

१) माहिती अधिकार कायदा २००५ च्या निर्मितीची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासणे.

२) माहिती अधिकार कायदा येण्यामागच्या पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

३) माहितीचा अधिकार कायदा लागू झाल्यानंतर च्या परिस्थितीचा अभ्यास करणे.

४) माहिती अधिकार कायद्याची प्रशसनातील अंमलबजावणीच्या कामाची तपासणी करणे.

५) माहिती अधिकारामुळे लोकांचे अधिकार आणि जबाबदारीत झालेल्या वाढीचा अभ्यास करणे.

६) माहिती अधिकार कायद्यामुळे शासकीय आणि निमशासकीय कर्मचाऱ्यांच्या वाढीव जबाबदाऱ्यांचा अभ्यास करणे.

७) माहितीशी संबंध असणाऱ्या व्यक्तीनेच माहिती मागवलेली आहे काय याचा अभ्यास करणे.

८) माहिती अधिकारांचा दुरुपयोग करून प्रशासनास वेठीस धरले जाते काय याचा शोध घेणे.

९) माहिती अधिकार कायद्यातील त्रुटी, उणिवा आणि मर्यादांचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके :-

"माहितीचा अधिकार कायदा २००५ : विशेष संदर्भ लातूर आणि नांदेड जिल्हा परिषदेतील अंमलबजावणीचा तूलनात्मक अभ्यास - इ.स.२०१५ ते इ.स.२०२०" या अभ्यास विषयाच्या संशोधनाची काही गृहितके निश्चित केली आहेत ती पुढीलप्रमाणे :-

१) सरकारी कामात होत असलेली दिरंगाई आणि बेजबाबदार कारभार थांबविण्यासाठी तसेच प्रशासनातील भ्रष्टाचार नष्ट करण्यासाठी हा कायदा तयार झाला आहे.

२) प्रशासकीय कारभारात पारदर्शकता आणण्यासाठी हा कायदा अस्तित्त्वात आला आहे.

३) माहिती अधिकारांची निर्मिती व्यक्तीच्या मूलभूत अधिकाराला बळकटी प्राप्त करून देण्यासाठी झाली आहे.

४) माहिती अधिकार कायद्याची निर्मिती ही सर्वसामान्य लोकांना प्रशासनातील बारकावे समजण्यासाठी झालेली आहे.

५) माहिती अधिकार कायद्याच्या निर्मितीने शासनाच्या विविध विभागात पारदर्शकता वाढलेली आहे.

संशोधन पद्धती :-

प्रस्तुत संशोधन विषयावर संशोधन करीत असताना हे संशोधन व्यावहारिक संशोधन प्रकारात मोडते. प्रस्तुत संशोधन हे परिचयात्मक संशोधन आहे. या कायद्याचा उपयोग करून माहिती मिळविण्यासाठी प्रयत्न केलेल्या आणि नमूना पाहणीसाठी निवडलेल्या उत्तरदात्यांकडून मिळणाऱ्या प्राथमिक तथ्यांच्या आधारे प्रस्तुत संशोधन करण्यात येणार आहे. प्राथमिक तथ्यांचे संकलन करण्यासाठी "मूलाखत अनुसूची" या तंत्राचा वापर करण्यात येणार आहे. त्याचबरोबर कार्यालयीन व्यवस्थापनाचे निरीक्षण करून त्या अनुषंगाने प्रस्तुत प्रबंध लेखन करण्यात येईल.

नमूना निवड :-

प्रस्तुत संशोधनासाठी लातूर आणि नांदेड जिल्ह्याचे कार्यक्षेत्र विस्तृत असल्यामुळे या संशोधनात नमूना निवड पद्धतीअंतर्गत गैर संभाव्यता नमूना निवड पद्धतीतील "सहेतूक किंवा उद्देशपूर्ण" नमूना निवड पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. नमूना निवड म्हणून सन २०१५ ते २०२० या कालावधीत माहिती अधिकाराचा वापर केलेल्या नागरिकांची निवड करण्यात येईल.

संशोधनाच्या मर्यादा :-

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने खालील मर्यादा आहेत.

१) संशोधनाचे कार्यक्षेत्र नांदेड आणि लातूर जिल्ह्यापुरतेच मर्यादित आहे. तसेच सन २०१५ ते २०२० या पाच वर्षापूरतेच हे संशोधन मर्यादित आहे.

२) संबंधित विषयाचा अभ्यास करण्यासाठी दोन जिल्ह्यातील काही कार्यालयाची नमूना निवड करण्यात येणार असल्याने बाकीच्या कार्यालयाची स्थिती पाहणे शक्य होणार नाही.

प्रकरणांची रूपरेषा :-

कोणत्याही संशोधकाकडे संशोधन करताना निश्चित स्वरूपाची उद्दिष्ट्ये असतात. हे उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर ठेवून संशोधकाला आपल्या संपूर्ण संशोधनाची आखणी करावी लागते. ही मांडणी अतिशय आवश्यक व महत्त्वाची असते. कारण अशा पूर्वनियोजित मांडणीतून किंवा निर्णयामुळे संशोधन भरकटत नाही व योग्य त्या निष्कर्षाप्रत संशोधन पोहचविण्यासाठी मदत होते.

प्रकरण पहिले : प्रस्तावना

शोध प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणात संशोधन विषयाची प्रस्तावना अभ्यासली जाणार आहे. तसेच माहिती अधिकार कायदा २००५ चा अभ्यास तसेच संशोधन विषयाचे महत्त्व, विषयाची उद्दिष्ट्ये, गृहितके, संशोधनाच्या पद्धती आणि प्रस्तुत अभ्यासनासंदर्भात पूर्व संशोधकांनी व्यक्त केलेली मते अभ्यासली जाणार आहेत. तसेच संशोधनासाठी निवडण्यात आलेल्या प्रकरणांचा प्रकरणनिहाय संक्षिप्त व नियोजन यांचे यथोचित विवेचन करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे : माहिती अधिकारांची ऐतिहासिक पार्श्वभूमी

या प्रकरणात माहिती अधिकाराची ऐतिहासिक पार्श्वभूमीचा सविस्तर अभ्यास करण्यात येणार आहे. कोणत्या गोष्टींच्या प्रभावामुळे हा कायदा अस्तित्त्वात आला याचाही अभ्यास या प्रकरणात करण्यात येणार आहे. भारतीय राज्यघटना, न्यायालयातील निर्णय, स्वयंसेवी संस्थांची आंदोलने, सामाजिक कार्यकर्त्यांचा सहभाग, विविध घटक राज्यातील कायदे, परिषदा यांचाही अभ्यास या प्रकरणात केला जाणार आहे.

प्रकरण तिसरे : केंद्रिय माहिती अधिकार कायदा २००५

सदरील प्रकरणात केंद्रिय माहिती अधिकार कायदा २००५ ची वैशिष्ट्ये, उद्दिष्ट्ये, स्वरूप, व्याप्ती, शिक्षा, अपील, अर्ज करण्याची पद्धती इत्यादी गोष्टींचा सविस्तर अभ्यास करण्यात येणार आहे. याचबरोबर हा कायदा अस्तित्त्वात येण्यापूर्वीच्या सामाजिक व राजकीय स्थितींचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे : लातूर आणि नांदेड जिल्ह्यातील माहिती अधिकार कायद्याची अंमलबजावणीची स्थिती

प्रस्तुत प्रकरणात माहिती अधिकार कायदा व लातूर आणि नांदेड जिल्ह्यातील अंमलबजावणीचा तूलनात्मक अभ्यास या प्रकरणात करण्यात येणार आहे. लातूर आणि नांदेड जिल्ह्यातील प्राप्त माहितीचा तूलनात्मक गोषवारा या प्रकरणात मांडण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे : निष्कर्ष आणि शिफारशी

शोधप्रबंधाच्या शेवटच्या प्रकरणात संशोधनाअंती आलेले निष्कर्ष व्यवस्थित रित्या मांडण्यात येणार आहेत तसेच योग्य त्या शिफारशी करण्यात येणार आहेत. त्यानतंर संदर्भसूची देण्यात येईल.

संदर्भसूची :-

१) आगलावे डॉ.प्रदीप, "संशोधन पद्धतीशास्त्रे व तंत्रे", विद्या प्रकाशन, नागपूर, २०००.

२) आवाळे मनोज, "माहितीचा अधिकार : दफ्तर दिरंगाई कायद्यासहित", कृषीदूत प्रकाशन, शिवाजीनगर, पुणे, २००६.

३) आवाळे मनोज, "माहिती अधिकाराची यशोगाथा", आदिश्रेय प्रकाशन, पुणे, २००८.

४) भारताचे राजपत्र, खंड १४, २२ डिसेंबर २००५

५) हजारे अण्णा, "माहितीचा अधिकार २००५", भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास, राळेगण सिद्धी, ता.पारनेर, जि.अहमदनगर, २००६.

६) हजारे अण्णा, "वाट ही संघर्षाची", सिग्नेट पब्लीकेशन, शनिवार पेठ, पुणे, २००७.

७) कुलकर्णी डी.एस., "भ्रष्टाचार निर्मूलन व उपाययोजना", सुयोग प्रकाशन, पुणे, २००६

८) कुलकर्णी डी.एस., "माहितीचा अधिकार", मनोरमा प्रकाशन, दादर पूर्व, मुंबई, २००७

९) फडके य.दि., "माहितीचा अधिकार", अक्षर प्रकाशन, मुंबई, २००२.

१०) गर्गे स.मा.(संपा.), "भारतीय समाज विज्ञानकोश", व्हाल्यूमर, पुणे, २००७.

११) Saxzena Ambrish, "Right to information and Freedom of Press", २००४.

१२) RTI Cell (Yashada), "Right to Information Reading Material".

१३) Nigam Shalu, "Right to Information Law and Practice", २००६.

१४) Baratwal S.P., "Good Governance in India", २००३.

१५) यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधनी (यशदा), "माहितीचा अधिकार २००५", जानेवारी २००६.

१६) दाते डॉ.सुनिल, "माहितीचा अधिकार आणि लोकशाही", समाजप्रबोधन पत्रिका, २००७.

१७) गोडबोले माधव, "प्रशासनाचे पैलू", श्री विद्या प्रकाशन, पुणे, २००२

१८) जाधव डॉ.एस.एम., "माहितीचा अधिकार", राजश्री प्रकाशन, पटेलनगर, धर्माबाद, २००८.

१९) मुथा मंजुषा, "माहितीचा अधिकार", साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २००६.

२०) देशपांडे अशोक, "माहितीचा अधिकार अधिनियम २००५", राजहंस प्रकाशन, पुणे, २००६.

संशोधक
वाघमारे हिरामन लिंबराज
एम.ए. (राज्यशास्त्र), सेट, नांदेड

मार्गदर्शक
प्रा.डॉ.आर.डी.शिंदे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख तथा संशोधक मार्गदर्शक,
लोकमान्य महाविद्यालय, सोनखेड, ता.लोहा, जि.नांदेड